पनवेल (प्रतिनिधी) रायगड मेडिकल असोशिएन आणि रोटरी क्लबने लोकांच्या गरजा ओळखून नेहमी सामाजिक उपक्रम राबवित आपले कर्तव्य व जबाबदारी योग्यरित्या पार पाडली आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे मंगळवारी केले.

रायगड मेडिकल असोसिएशन, आय.एम.ए.पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल, रोटरी क्लब ऑफ न्यु पनवेल, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन, रोटरी क्लब ऑफ पनवेल मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील मिडलक्लास को.ऑप.सोसायटीमधील गणेश मंदिराच्या सभागृहात भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरिक्षक रमेश घडवले, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष रो.डॉ.प्रमोद गांधी, आय.एम.ए.पनवेल अध्यक्ष रो.डॉ.रमेश पटेल, रोटरी क्लब ऑफ न्यु पनवेलचे अध्यक्ष सुरेश शेडगे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष मोहन महाजन, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊनचे अध्यक्ष डॉ.संपत ससाणे, रोटरी क्लब ऑफ पनवेल मिडटाऊनचे अध्यक्ष महेश राणे, रो.अनिल परमार, शहर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष दिपक मिरानी, मिडलक्लास हौसिंग सोसायटीचे अध्यक्ष श्री.शेटये, यांच्यासह डॉक्टर्स आणि रोटरीयन व रक्तदाते उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयोजकांच्या उपक्रमांचे कौतुक करून त्यांना पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर रोटरी क्लबला समर्पित भावनेतून सर्वाधिक निधी मिळवून देण्याचे महत्वपूर्ण काम केल्याबद्दल आपल्या भाषणातून डॉ.अनिल परमार यांचा गौरव केला. तसेच रायगड मेडिकल असोसिएशन नेहमी रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्याला सातत्याने मदत करत असल्याचे सांगून डॉ.प्रमोद गांधी तसेच रोटरीयनसचे त्यांनी आभार व्यक्त केले.त्याचप्रमाणे रोटरी क्लबने सामाजिक उपक्रमांचा वसा कायम ठेवून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली असून रोटरी परिवाराचा मी पण एक घटक आहे याचा मला अभिमान वाटतो, असेही आपल्या भावना व्यक्त करताना म्हंटले.